9

उत्सव

© NCERT not to be republished

भारतीय कालदर्शिकेनुसार मकरसंक्रांत, पोंगल, बिहू किंवा लोहरी यासारखे सण म्हणजे हिवाळ्यातून उन्हाळ्यात होणाऱ्या संक्रमणाची सुरूवात असते। सूर्याच्या आरामदायी उबदारपणाची चाहूल नुकतीच प्रकट होत असते आणि पिकांचे सुगीचे दिवस सुरू झालेले असतात। मुले ज्या वेगवेगळ्या स्थानिक उत्सवाची वाट पाहत असतात व आपल्या कुटुंबीयांसमवेत सण साजरा करतात, त्याबद्दलही मुलांशी चर्चा व्हायला हवी। चित्रे प्रत्येक उत्सवाचा मूळ हेतू काय, त्यांतील वेगवेगळे आकार आणि नमुने (पॅटर्न)कसे असतात, या गोष्टी अधोरेखित करतात आणि या गोष्टींची चर्चा मुलांसोबत करता येऊ शकते।

© NCERT
to be republished

रेखांकन करून नमुने पुढे न्या।

अ. 

ब. 

क. 

ड. 

इ. 

फ. 

ग. 

ज. 

मुलांना नमुने तयार करण्यासाठी ठोस वस्तू वापरण्यास प्रोत्साहित करा।

© NCERT not to be republished

चला करू या

मुन्नाला रंगांची खूप आवड आहे। अंगठा आणि बोटांच्या ठशांनी त्याने एक नमुना तयार केला आहे। तुम्हीदेखील दिलेल्या जागेत तुमच्या अंगठा आणि बोटांच्या ठशांनी असा नमुना तयार करू शकता।





गुलाबी नंतर कोणता रंग येईल आणि का? चर्चा करा

मुलांना वेगवेगळ्या भाज्या गोळा करायला सांगा आणि मोठ्यांच्या मदतीने त्या कापून त्यांचे तुकडे करा। तुमच्या आवडीचा नमुना तयार करण्यासाठी या भाज्यांचे काप वापरा।

© NCERT not to be republished

नमुने पहा आणि ते रंगवून पुढे न्या।



गाळलेले भाग भरून नमुना पूर्ण करा।



© NCERT not to be republished

नमुना अभ्यासून गाळलेल्या संख्या भरा।





© NCERT not to be republished

मुर्ती आणि वाणी त्यांच्या अम्माला कोलम काढण्यात मदत करत आहेत। त्यांना कोलम पूर्ण करण्यासाठी तुम्हीदेखील मदत करू शकता।



प्रकल्प कार्य

अ. खडे, फुले, पाने, काचा, वाट्या, काठ्या, बांगड्या, नाणी, टोप्या इत्यादी गोळा करा आणि त्यांची एका नमुन्यात रचना करा। दागिने, फुलांच्या भांड्यांची मांडणी, कलाकुसर केलेल्या शोभेच्या वस्तू इ। आपल्या आवडीचे वेगवेगळे नमुने तयार करून बघा।

ब. निसर्गामधील पाने, फुलपाखरे, मधमाश्यांचे पोळे, तसेच मांजर, कुत्रा, वाघ, झेब्रा यांसारख्या प्राण्यांची कातडी आणि पडदे, साड्या,ओढण्या, टाईल्स अशा गोष्टींचे निरीक्षण करून त्यातील आकार-आकृत्यांचे नमुने शोधा।

क. आजूबाजूला दिसणाऱ्या विविध वस्तू गोळा करा आणि त्यांपासून कोलाज करा।

ड. टाळ्या वाजवणे, चुटक्या वाजवणे, तुमच्या पायावर शिक्के मारणे इत्यादी विविध क्रिया करून नमुने तयार करा।

आपल्या सभोवतालचे जग विविध आकारांनी भरलेले आहे। मुलांना मंदिरे, मशीद, चर्च, गुरूद्वारा आणि त्यांच्या सभोवतालच्या स्मारकांमधील सुंदर नमुने शोधून भारताच्या समृद्ध वारशाचे कौतुक करण्यास प्रोत्साहित करा। तसेच विविध कला प्रकारांमधील, नृत्य प्रकारातील हालचालींमधील इ। नमुन्यांची त्यांची निरीक्षणे सामायिक करण्यास सांगा।

© NCERT not to be republished